माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ ४९४८/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे- १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
श्रीमती सुचेता वसंत खोकले	पोलीस उपअक्षिक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे	पोलीस अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

(सुनावणी दिनांक- ०८/०४/२०२५ व २०/०५/२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. ११/०८/२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती नाकारली, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार सदर सुनावणीसाठी दि. ०८/०४/२०२५ रोजी विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत तसेच दि. २०/०४/२०२५ अपिलार्थी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
०१.०३.२०२३	आर्थिक गुन्हे शाखा, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे चौकशी क्र. ११/२०२२ आणि १२/२०२२ श्री. कुणाल शहा व श्री.सुनील झंवर यांनी ऑगस्ट २०२२ ते आजपर्यंत शासनाकडे सादर केलेल्या तक्रारी अंती सहपत्रे सादर केलेला अहवाल, तक्रारदार यांचे तक्रारी अर्जाची प्रत, चौकशी बाबतचे आदेश, कागदपत्रे व जबाबांच्या प्रती इ. माहिती

आज दि. ०८/०५/२०२५ रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांनी कथन केले की, "अर्जदार हे त्रयस्थ व्यक्ती असल्याने सदरची माहिती ही माहिती अधिकार अधिनियम कलम ८ (छ) प्रमाणे माहिती नाकारण्यात आल्याचे दि. १४/०३/२०२३ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थिंना कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी या दि. ०८/०४/२०२५ रोजीच्या सुनावणीस गैरहजर असल्याने त्याबाबतचा त्यांचा खुलासा दि. १०.०४.२०२५ रोजी आयोगास ईमेलद्वारे प्राप्त झाला आहे. अपिलार्थीना सुनावणीस हजर राहण्याबाबतची नोटीस अपील दिनांक उलटून गेल्यानंतर दि. ०९/०४/२०२५ रोजी प्राप्त झाल्याने सदर सुनावणीस त्या हजर राहू शकल्या नाहीत. सदर प्रकरणी एकतर्फी निर्णय न घेता अपिलार्थीचे म्हणणे मांडण्याची संधी मिळावी याकरिता त्यांनी पुढील

तारीख मिळावी अशी विनंती आयोगाकडे केली होती. त्यानुसार अपिलार्थी यांचे म्हणणे मांडण्यासाठी दि. २०/०५/२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार सदर सुनावणीस अपिलार्थी हजर होते.

प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि. ११/०५/२०२३ रोजीच्या प्रथम अपिल आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम सन २००५ मधील कलम ८(१) (G) अंतर्गत माहिती नाकारली होती. परंतू अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकारी अधिनियम सन २००५ मधील कलम ८(१) (H) नुसार अपवाद केलेली माहिती आहे, त्यामुळे माहिती देण्यास अडथळा आहे. नमूद कलमाचे अनुषंगाने केंद्रिय माहिती आयोगाने श्री. अरुणकुमार अग्रवाल वि. सेबी (SEBI) या प्रकरणामध्ये दि. १९ डिसेंबर २०१४ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये नमूद केलेल्या बाबींचे अनुषंगाने सदरचे अपील अमान्य असून प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान दि. १६/०४/२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगाकडे सादर केले आहे. सदर लेखी निवेदनात खालील प्रमाणे मुद्दे सादर केले आहेत.

१) मी आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर येथे नेमणुकीस असताना डेक्कन पोलीस स्टेशन गु.र.न. ६७३/२०२२ भा.द.वि. कलम ३४२०, ४०६, ४०९, ४३८, १२० ब व इतर या गुन्हयाचा तपास केला असुन २० आरोपींविरुध्द मा. विशेष सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे येथे दोषारोपपत्र दाखल केलेले असुन त्याचा स्पेशल कोर्ट केस नंबर १६१/२०२१ असा आहे.

२) या गुन्हयामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशाने अटकेपासून संरक्षण असलेला आरोपी कृणाल कांतीलाल शहा आणि दोषारोप पत्र दाखल असलेला आरोपी सुनील देवकीनंदन झंवर व महावीर मानकचंद जैन यांनी शासनाकडे दाखल केलेले अर्ज हे आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अनुक्रमे आर्थिक क्र. ११/२०२२, १२/२०२२, व १३/२०२२ अन्वये नोंद आहेत.

३) अर्ज क्र. ११/२०२२, १२/२०२२ चे चौकशी करिता दि. ०३/११/२०२२ रोजी हजर राहणे बाबतचे समजपत्र मला कुंडलिक गाढवे, पोलीस उप अधीक्षक तथा चौकशी अधिकारी, पुणे पथक, गुअवि, म. राज्य पुणे यांचेकडून जा. क्र./पो उप अधी/गुअवि/११-१२-चौकशी/६०८२/२०२२, दि.३१/१०/२०२२ अन्वये प्राप्त झाले.

४) सदर समजपत्रानुसार मी चौकशी अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहिले आणि दोन्ही अर्जाचे वाचन केले. परंतु अर्जदारांचे अर्ज व सहपत्रे यांची संख्या जास्त असल्याने व गुन्हयाची व्याप्ती देखील मोठी असल्याने कागदपत्रे पाहून जबाब देणे सोयीचे व्हावे याकरिता अर्ज व कागदपत्रांची तोंडी मागणी चौकशी अधिकाऱ्यांकडे केली परंतु त्यांनी अर्ज व सहपत्रे देण्यास नकार दिला. त्यामुळे याबाबतचा दि. ०४/११/२०२२ रोजीचा माझा विनंती अर्ज मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे यांना सादर केला. परंतु, त्या अर्जावर आजपर्यंत काहीएक उत्तर प्राप्त नाही.

५) अर्ज व कागदपत्रे न मिळाल्यामुळे माझ्या स्मरणशक्ती नुसार मी दोन्ही अर्जांचे वेळोवेळी जबाब नोंदवले. या जबाबाची प्रत देखील मला मागणी करुनही मिळाली नाही.

६) जन माहिती अधिकारी, गुन्ह अन्वेषण विभाग, आर्थिक गुन्हे शाखा यांचेकडे दि. ०१/०१/२०२३ रोजीच्या माहिती अधिकार अर्जान्वये अर्ज क्र. ११/२०२२ आणि १२/२०२२ बाबत पुढील माहिती मागवली. - i)

अर्जदार कृणाल शहा व सुनील झंवर यांनी शासनाकडे केलेले तक्रारी अर्ज व सहपत्रे, ii) अर्ज चौकशीबाबतचे आदेश, iii) अर्ज चौकशी दरम्यान नोंदवलेले सर्व जबाब, iv) अर्ज चौकशी करिता प्राप्त केलेली सर्व कागदपत्रे, v) अर्ज चौकशीचा सादर केलेला अहवाल- (अहवाल दाखल असल्याचे रिट पिटीशन क्र. १०६/२०२३ मधील मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. ०८/०२/२०२३ चे आदेशानुसार समजले आहे.तसेच याच आदेशान्वये अहवाल दाखल असल्याने चौकशी विरुध्द दिलेले संरक्षण देखील रद्द केले.) **(माहिती अधिकार अर्ज सहपत्र ३ व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा रिट पिटीशन क्र. १०६/२०२३ मधील दि. ०८/०२/२०२३ रोजीचा आदेश**

७) जन माहिती अधिकारी, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे यांचे जा. क्र. १३२७/२०२३, दि. १४/०३/२०२३ च्या पत्रान्वये मला माहिती नाकारण्यात आली आणि सदर पत्रामध्ये नमूद करण्यात आले की, आपण माहिती अधिकाराखाली मागितलेली माहिती ही अर्जदार यांनी आपण त्रयस्थ व्यक्ती असल्याने अर्जदार यांनी त्रयस्थ व्यक्तीस माहिती देण्यात येऊ नये असे कळवल्याने सदरची माहिती ही माहिती अधिकार अधिनियम कलम ८ (छ) प्रमाणे नाकारण्यात येत आहे.

अशा रीतीने माझी चौकशी करुनही मला त्रयस्थ व्यक्ती ठरवून अन्यायकारक रित्या मला माहिती नाकारण्यात आल्याचे अपिलार्थी यांनी त्यांच्या उपरोक्त खूलाशामध्ये नमूद केले आहे.

वरील सर्व विवेचनावरुन दिसून येते की, अपिलार्थी या पोलीस निरिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर या पदावर कार्यरत असताना त्यांनी डेक्कन पोलीस, गु.र.न. ६७३/२०२२ भा.द.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, ४३८, १२० ब या गुन्हयांचा तपास केला असुन कोर्टामध्ये आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदर गुन्हयांतील काही आरोपीनी अपिलार्थी यांचे विरुध्द राज्य शासनाकडे दाखल केलेल्या तक्रार अर्जाची चौकशी आ.गु.शा., गु.अ.वि, पुणे यांचेकडे सुरु होती. सदर चौकशीमध्ये जबाब देण्यासाठी अपिलार्थी यांना संबंधित कागदपत्रांची आवश्यकता होती म्हणून त्यांनी दि. ०१/०३/२०२३ रोजी जन माहिती अधिकारी गु.अ.वि., म.राज्य, पुणे यांचेकडे माहिती अधिकाराचा अर्ज केला होता.

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक, आ.गु.शा., गु.अ.वि., पुणे यांनी दि. १४/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार कायदा कलम ८ (छ) प्रमाणे त्यांना माहिती नाकारण्यात आली. अपिलार्थी या त्रयस्थ व्यक्ती असल्याने त्रयस्थ व्यक्तीस माहिती देण्यात येवू नये असे संबंधित तक्रारदार यांनी कळविल्याने अपिलार्थीस माहिती नाकारल्याचे दिसून येते.

अपिलार्थी श्रीमती सुचेता वसंत खोकले तथा पोलीस निरिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर या पदावर कार्यरत असताना त्यांनी अर्जदार यांच्या विरोधात गुन्हाचा तपास केला आहे व त्यांचे विरुध्द कोर्टात दोषारोपपत्र सादर केले आहेत. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी हे त्रयस्थ व्यक्ती नसून अर्जदार यांचेविरुध्द दाखल झालेल्या गुन्हयाचे तपास अधिकारी आहेत त्यामुळे त्यांना त्रयस्थ व्यक्ती ठरवून माहिती अधिकार कायदा कलम ८ (छ) प्रमाणे माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय संपुर्णपणे चुकीचा व बेकायदेशीर असल्याचे दिसून येते.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गु.अ.वि. महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि. ११/०५/२०२३ रोजीच्या प्रथम अपिल आदेशामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (H) नुसार अपवाद केलेली माहिती आहे, त्यामुळे माहिती देण्यास अडथळा आहे. असे नमूद कलमाच्या अनुषंगाने माहिती नाकारल्याचे दिसून येते.

अपिलार्थी या संबंधित गुन्हयाच्या स्वत: तपास अधिकारी असून त्यांना त्यांचेविरुध्द असलेल्या तक्रार अर्जाच्या चौकशीकामी स्वत:चा बचाव करण्यासाठी जोडपत्र अ मध्ये मागणी केलेली माहिती हवी असल्याचे दिसून येते. अपिलार्थी श्रीमती. सुचेता वसंत खोकले या जबाबदार पोलीस अधिकारी असून त्यांचेमुळे अर्ज चौकशी प्रक्रीयेत अडथळा येईल हे प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, गु.अ.वि. महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही. तसेच यापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालय, विविध उच्च न्यायालय व देशाचे मुख्य माहिती आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयाशी विसंगत असून नैसगिक न्यायतत्वाचे उल्लंघन करणारे आहे. म्हणून अपिलार्थी यांना कलम ८ (छ) प्रमाणे माहिती नाकारण्याचा निर्णय संपूर्णपणे बेकायदेशीर आहे.

एखाद्या नागरिकाला त्याच्या विरुध्दच्या तक्रार अर्जाची चौकशी किंवा गुन्हयाच्या तपासामध्ये स्वत:चा बचाव करण्यासाठी संबंधित चौकशी अधिकारी किंवा तपासी अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती मागण्याचा अधिकार असल्याबाबत यापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालय, विविध उच्च न्यायालय व भारताचे मुख्य माहिती आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेले निकाल खालीलप्रमाणे आहेत.

Case laws of Hon'ble Supreme Court of India, Various High Courts and Chief Information Commissioner Of India.

1) The records of the case reveal that the information is sought by the Appellant in order to defend himself before the CBI Court and prove his innocence. A Criminal trial is a public activity. Hence furnishing of the said information is a part of the Fundamental Constitutionl Right to Life and Liberty of the Appellant as granted under the Articl 21 of the Constitution of India. Even on this count the information as sought by the Appellant should be supplied to him. [CIC/MA/A/2008/1233/AD]

2) The Commossion asked the PIO to explain how disclosing the notings would impede the prosecution. The PIO had stated that notings expressed various views and the appellant would produce these in Court to defend his case. The Act has barred information which is the subject matter of investigation or Prosecution. Hence, it is necessary for the PIO to show how the invesetigation or Prosecution would be impeded. Mere because the truth as it existis on the notings would be placed befor the Court it is not logical to assure that it would be considered impeding the prosecution. The Court would obviously look at everything that is placed befor it and recealing all records could only assist the Court in coming to the right conclusion. [CIC/DS/A/2010/000415/SG/8394]

3) If the Copice of sheets sought are inporatant in establishing the charge or innocence of the charge-sheeted officers,the appellant-accused is entitled to have copy of the same, under principles of natural justice and also under rules of domestic inquiry. According to the officers, the appellant is entitled to the copy of documents relied on them to establish charges. Thus, what could bt given to accused in domestic inquiry cannot be denied under the RTI Act. Once a request os filed, The PIO of the public authority has to decide whether it could be given or not under RTI Act. And PIO can neither regect or redirect it to a different forum or low for securing the information. If the public authority is worried abourt security of the records if affered for inspection or photocopying, they are entitled to take any measure to protect them but cannot

deny the access to copies, certified to be so. Such an inspection could take place during. The inquiry also. [Manju v. Department of Posts, CIC/POSTS/A/2017/130777; 14. 06. 2017]

4) 'personal information' does not mean information relation to the information seeker, but about a third party. That is why, in the Section, it is stated "unwarranted invasion of the privacy of the individual". If one were to seek information about himself or his own case, the question of invasion of privacy of his own self does not arise. [PBA/06/195, 278/ICPB/2006, CIC/WB/C/2007/0011, 451/ICPB/2007, 374/ICPB/2006]

5) **Complaints filed against oneself-** The appellant sought copies of complaints fild against her. CIC ruled that proper reply was not providedto the appellant by quoting section 8 (1) (j) and 8 (1) (g) exemptions which are not applicable or misplaced as the appellant wanted information pertaining to herself, Holding that the reply is deplorable, the CIC issued stricture against Shri Hemant Kumar, General Manager for quoting impropriate sections of the RTI Act for claiming exemption under the Act. [Pratima Minj v. FCI, CIC/FCIND/A/2017/131702; 23. 07. 2018]

6) In R.K.Jain v. State Bank of India, decided on 4.3.2008, where the appellant had sought some documents which CPIO denied on the ground that a departmental inquiry was going in on in the matter, the CIC directed that if the Inquiry officer had denied these documents then CPIO should supply their copies to appellant.

7) The Delhi High Court has held in Bhagat Singh v. Chief Information Commissioner oner, Q.P. (C) No. 3114 of 2007 decided on 3. 12. 2007

"It is apparent that the mere existence of an investigation process cannot be a ground for refusal of the information; the authority withholing must show satisfactory reasons as to why the release of such information would hamper the investigation process. Such reasons should be germane, and the opinion of the process being hampered should be reasonable and based on some material. Sans this consideration, Section 8 (1) (h) and other such provisions would become the haven for dodging demands for information."(para 13)

8) **Burden is on Public Authority to show in what manner disclosure would 'impede' investigation.**

"As regards Section 8(1) (h) RTI Act, which is the only provision incvoked by the Respondend to deny the petitioner the information sought by him, it will have to be showm by the Public authority that the information sought "would impede the process of investigation." The mere reproducing of the wording of the statute would not be sufficient when recourse is had to Section 8(1) (h) RTI Act. The burden is on the public authority to show in what manner the disclosure of such information would 'impede' the investigation."

[B.S. Mathur v. PIO, Delhi High Court,WP(C) – 295/2011 d. 3. 6. 2011, para 19]

9) In case of grave injustice. When non-disclosure results in grave injustice then the information has to be disclosed in public interest, for instance, in case of undue delay in finalization of proceedings [A.K. Goyal v. DTC dated 15. 10. 2007] or relevant document has not been made

available by disciplinary authority. "Obviously, providing such documents can only serve the cause of natural justice and not affect adversely the course of investigation" – observed CIC [Rakesh kumar v. SBI, dated 27. 4. 2010] In R.P. Kalra v. Naval Hqrs., d. 29. 10. 2008, CIC allowed disclosure of " Action taken againse the erring official who delayed in conduct of inquiry."

10) **Exemption under Section 8(1) (h) is for a limited period**

Exemption under Section 8 (1) (h) necessarily is for a limited period and has a end point i.e. when process of investigation is complete or offender has been apprehended and prosecution ends. Protection from disclosure will also come to an end when disclosure of information no longer causes impediment to prosecution of offenders, apprehension of offenders or further investigation." [Union of India v. CIC case, para 86]

11) **Public Authority must have reasonable basis to deny information**

"However, the impediment, if alleged, must be actual and not make belief and a camouflage to deny information. To claim exemption under the said Sub-section it has to be ascertained in each case whether the claim by the public authority has any reasonable basis. Onus under Section 19 (5) of the RTI Act is on the public authority." [Union of India v. CIC case, para 86]

12) **It does not provide for blanket exemption**

"The Section does not provide for a blanket exemption covering all information relating to investigation process and even partial information wherever justified can be granted." [Union of India v. CIC case, para 86]

13) **Even during pendency of Disciplinary Proceedings information has to be disclosed when The view is that disclosure will not impede investigation**. Information has to be provided where the CIC is of the view that the disclosure of information will not hamper the pending disciplinary proceedings [V. V. Subramanian v. Hindustan Vegtable Oils Corpn. Ltd., No. CIC/SS/A/2010/000363 dated 27. 9. 2010

14) **Information needed for self defence**

It is also relevant to observe that denial of any information available with a public authority, which could assist an alleged offender from establishing his innocence or for pursuing his defence may, in fact, impede the course of justice. It will not be open for the public authority to deny information on the ground that such information may assist the offender in pursuing his defence (and therefore impede his prosecution) This is clearly not the import of section 8(1)(h) of the RTI Act. The exclusion u/s 8(1)(h) of the RTI Act. –information which would impede process of investigation or apprehension or prosecution of the offenders has to be read in conjunction with Article 19(2) of the Constitution of India. Such denial must be reasonable and in the interest of public order. [UoI v. Manjit Singh Bali, WP (C) 6341/2015 and WP (C) 1803/2018; 06. 08. 2018, HC Delhi]

15) The records of the case reveal that the information is sought by the Appellant in order to defend himself before the CBI Court and prove his innocence. A criminal trial is a public activity.

Hence, furnishing of the said information is a part of the Fundamental Constitutional Right to Life and Liberty of the Appellant as granted under the Article 21 of the Constitution of India. Even on this count the information as sought by the Appellant should be supplied to him. [Mr. A. L. Motwani v. ITI Limited, CIC/MA/A/2008/1233/AD; 10. 02. 2009, Division bench.]

16) **Information about oneself**

If one were to seek information about himself or his own case, the question of invasion of privacy of one s own self does not arise. Therefore, when a citizen seeks information about his own case and as long as the information sought is not exempt in terms of other provisions of section 8 of RTI Act, the PIO should provide the information

PRINCIPLES OF NATURAL JUSTICE
(Article 14 & Article 21 Of The Constitution Of India)

Natural Justice in simple terms means the minimum standards or principles which the administrative authorities should follow in deciding matters which have the civil consequences. There are mainly two Principles of Natural Justice which every administrative authority should follow whether or not these are specifically Provided in the relevant Acts or rules. Principles are:

1. No one should be the judge in his/her own case

2. Each party should be given the opportunity to be heard

Natural Justice implies fairness, reasonableness, equity and equality. Natural Justice is a concept of Common Law Natural Justice represents higher procedural principles developed by judges which every administrative must agency follow in taking any decision adversely affecting the rights of a private individual.

The principles of natural justice are firmly grounded under various Article of the Constitution. With the introduction of the concept of substantive and Procedural due process in Article-21 of the Constitution all that fairness which is included in the principles of natural justice can be read into Article-21 when a person is deprived of his life and personal liberty In other areas it is Article-14 which incorporates the principles of natural justice. Article-14 applies not only to discriminatory class legislation on but also to arbitrary or discriminatory State action. Because violation of natural justice results in arbitrariness therefore violation of natural justice is violation of Equality Clause of Article-14. Therefore, now the principle of natural justice cannot be wholly disregarded by law because this would violate the fundamental rights guaranteed by Articles -14 and 21 of the Constitution.

वरील सर्व निकालावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. ०१/०३/२०२३ रोजी माहिती अधिकारान्वये मागणी केलेली माहिती तसेच वेळोवेळी पत्राव्दारे केलेली मागणी ही त्यांचेविरुध्द सुरु असलेल्या तक्रार अर्जाच्या चौकशीकामी स्वता: बचाव करण्यासाठी त्यांना उपलबध करुन देणे संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आद्य कर्तव्य तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वाला अनुसरुन (Principles of Natural Justice) आवश्यक होते. म्हणून जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे

अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, गु.अ.वि. महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली जोडपत्र-अ मधील माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे आयोगाचे स्पष्ट मत झाले आहे.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८) (२) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सदर केसकामी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. १४/०३/२०२३ रोजीच्या पत्राने माहिती अधिकार अधिनियम कलम ८(छ) प्रमाणे माहिती नाकरण्याचा घेतलेला निर्णय कायद्याशी, नैसर्गिक न्याय तत्वाशी सुसंगत नसल्याने सदर निर्णय रद्द करण्यात येत आहे.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, गु.अ.वि. महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपिलार्थीस माहिती दिली तर चौकशीकामी अडथळा निर्माण होईल असे कारण सांगून माहिती अधिकार अधिनियम कलम ८(१) (h) प्रमाणे माहिती नाकरण्याचा दि. ११/०५/२०२३ रोजी घेतलेला निर्णय कायद्याशी व नैसर्गिक न्यायतत्वाशी सुसंगत नसल्याने सदरचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र अ मध्ये मागणी केलेली माहिती ७ दिवसांचे आत (दि. १३/०७/२०२५ पर्यंत) अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

५. अपिलार्थी यांना त्यांच्या विरुध्दच्या अर्ज चौकशीचे सर्व कागदपत्रांचे अवलोकन करण्याची संधी देण्यात यावी व त्यांनी चिन्हांकीत केलेली कागदपत्रे ७ दिवसात त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

६. वरिल प्रमाणे आदेशाची पूर्तता करुन पूर्तता अहवाल पोलीस अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गु.अ.वि. महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी १५ दिवसात आयोगाकडे सादर करावा.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ/४९४८/२०२३ /पुणे 8138/2025 दिनांक - 6/6/2025

रामाआ-पुणे/२०२५/RCG